# तुमचे भविष्य तुमच्या हातात

**(हस्तरेषा मार्गदर्शन)**

**डॉ. विनोदकुमार पंड्या**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**तुमचे भविष्य तुमच्या हातात : Tumche Bhavisha Tumchya Hatat**
डॉ. विनोदकुमार पंड्या

**© डॉ. विनोदकुमार डी. पंड्या**
२१/९४१ बाळकृष्ण टॉकीजसमोर, जवाहरनगर,
इचलकरंजी. फोन नं. (०२३०) २४४००६४, २४४११३४
मो. ९३७१२३१४६२, ७५८८८३८९५३

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १६०/-

# *मनोगत*

हस्तरेषा हे काही आजचे शास्त्र नाही. हजारो वर्षांपूर्वीपासून सखोल अभ्यास करूनच त्याची प्रगती होत गेली. सखोल संशोधन आणि अभ्यासाद्वारेच त्याचा विकास झाला, त्यामुळेच तर त्याला 'हस्तरेषाशास्त्र' असे म्हटले जाते. अनेक विज्ञानवादी लोकांना हे शास्त्र अंधविश्वासावर आधारित आहे असे वाटते, मात्र शरीरशास्त्र, मानसशास्त्र यांच्या सिद्धांताच्या आधारावरच त्याची निर्मिती झाली असल्यामुळे त्याच्या विश्वासार्हतेला कुठेही बाधा येत नाही.

शरीरशास्त्रामध्ये जसा बाह्य शरीराचा अभ्यास करून अनेक व्याधी, समस्यांची उकल केली जाते त्याचप्रमाणे हस्तरेषाशास्त्रामध्ये हातावरील रेषा, चिन्हे यांचा अभ्यास करून मानसिक, शारीरिक तसेच इतर अनेक अडचणी सोडवता येतात. त्यामुळे गरीब, श्रीमंत, लहान बालके, अधिकारी, व्यापारी, उद्योगपती, गुन्हेगार अशा सर्व प्रकारच्या व्यक्तींना उपयोगी पडणारे असे हे शास्त्र आहे.

गेली अनेक वर्षे हस्तरेषांचा अभ्यास करत असताना मला वेगवेगळे अनुभव आले. त्यापैकी दोन उदाहरणे वाचकांसाठी देत आहे, जेणेकरून या शास्त्रामधील बारकाव्यांविषयी वाचकांना माहिती मिळेल.

साधारण ६५ वर्षे वयाचे एक गृहस्थ माझ्याकडे हात दाखविण्यासाठी आले होते. आपला हात दाखविण्यापूर्वी ते म्हणाले, ''यापूर्वीही मी एका ज्योतिषाला हात दाखवला होता. माझ्या हातावरील योग पाहून त्यांनी मला आश्चर्याने विचारले की, 'तुम्ही अजून जिवंत कसे आहात? तुमचा मृत्यू यापूर्वीच घडायला पाहिजे होता, असे दिसते. मग मी जिवंत कसा?'' मी त्यांचा हात पाहिला व म्हणालो, ''तुमची हृदयरेषा व मस्तकरेषा एकत्र आल्यामुळे अचानक मृत्यू होण्याची शक्यता होती; परंतु आयुष्यरेषा संपूर्ण निर्दोष असल्यामुळे अशी घटना घडू शकली नाही.'' यामुळे त्या गृहस्थाचे शंका-समाधान झाले.

४७ वर्षे वयाची एक व्यक्ती माझ्याकडे आली. त्यांच्या हातावर मला दोन लग्नांचा योग दिसत होता. पण त्यांचे म्हणणे होते की, 'आता ४७ व्या वर्षी ही गोष्ट कशी शक्य आहे?' मी म्हणालो, ''पत्नीव्यतिरिक्त आणखी एखादी स्त्री तुमच्या जीवनात असण्याची शक्यता आहे.'' त्यांनीही ही गोष्ट मान्य केली. मी त्यांना 'वयाच्या ४९ व्या वर्षी सावध राहा' असा सल्ला दिला. ४९ व्या वर्षीच त्यांचे हे प्रेमप्रकरण कुटुंबियांना समजले. बराच वादविवाद होऊन घटस्फोटापर्यंत प्रकरण जाण्याची वेळ आली. मी त्यांना व्यवस्थित मार्गदर्शन करून ते प्रकरण सोडवले व नंतर सगळे पूर्ववत झाले.

अशा प्रकारच्या अनेक समस्यांसाठी हस्तरेषाशास्त्र उपयोगी ठरू शकते. या शास्त्राची ओळख करून घेण्यासाठी हे पुस्तक तुम्हाला नक्कीच साहाय्यभूत ठरू शकेल. या पुस्तकाच्या निर्मितीमध्ये मला मदत करणारे रमेशचंद्र जोशी, प्रकाशक शीतल मेहता, पुस्तकाला पूर्ण स्वरूप देणारे रावजी देसाई यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.


**डॉ. विनोदकुमार पंड्या**

# अनुक्रमणिका


- हातावरील रेषांचा अभ्यास अथांग आहे / ९
- हातावरील रेषांचा अभ्यास अथांग आहे / ११
- हस्तरेषा विज्ञान-बोटांची नावे, ग्रह व पर्वत / १२
- आयुष्यरेषा (जीवनरेषा)वरून विशिष्ट योग / १४
- मस्तकरेषेवरील विशिष्ट योग / ५०
- भाग्यरेषे (धनरेषा) वरून विशिष्ट योग / ७४
- हृदयरेषेवरून विशिष्ट योग / ९२
- शुक्र पर्वतावरून विशिष्ट योग / १०४
- सूर्य पर्वतावरील विशिष्ट योग / ११६
- चंद्र पर्वतावरून विशिष्ट योग / १२८
- बुध पर्वतावरील विशिष्ट योग / १३४
- मंगळ पर्वतावरून विशिष्ट योग / १३८
- गुरू पर्वतावरील विशिष्ट योग / १४४
- शुक्र पर्वतावरील विशिष्ट योग / १४५
- सूर्य रेषेवरील विशिष्ट योग / १४६
- भाग्य रेषेवरील विशिष्ट योग / १४७
- हातावरील विशिष्ट योग / १४८
- हृदय रेषेवरील विशिष्ट योग / १४९
- हातावरील विशिष्ट योग / १५०
- हस्तरेषा विज्ञान / १५२
- हस्तरेषांची चिन्हे / १५३
- कमनशिबी योगामुळे व्यापारात नुकसान / १७६
- कलाक्षेत्रात प्रगती / १७९
- कौटुंबिक समस्या व समाधान / १८१
- लग्नरेषा दूषित पत्नी समस्या / १८२
- प्रवासामुळे भाग्योदय / १८४
- रंगेल वृत्तीमुळे बदनामी / १८६
- दुरून डोंगर साजरे / १८९
- निवडलेल्या क्षेत्रातील यश / १९०
- अल्प आयुष्य संतान योग / १९३
- सुख दु:खाची हारमाळ / १९४
- नोकरीमध्ये समस्या / १९७
- संघर्ष नंतर स्थिरतेचा हात / १९९
- स्वस्थ शरीर उत्तम सुख / २०२
- तरंगी व काल्पनिक विचार / २०४
- आरोग्य हीच संपत्ती / २०८
- संबंधिताकडून आधार मिळाला / २१०
- संघर्ष नंतर अधिकारीचा हात / २१२
- दूषित लग्नरेषा / २१४


✦✦✦

## उजवा हात



# हातावरील रेषांचा अभ्यास अथांग आहे

१) **आयुष्यरेषा–** गुरू पर्वतावरून निघालेली व शुक्र पर्वतास घेरा घेऊन पुढे शुक्र पर्वताच्या पायथ्यास जाणाऱ्या रेषेला आयुष्यरेषा किंवा जीवनरेषा असे म्हणतात.

२) **हृदयरेषा–** बुध पर्वतावरून गुरू पर्वतापर्यंत किंवा शनि पर्वतावर जाणारी रेषा हृदयरेषा आहे.

३) **मस्तकरेषा–** गुरू पर्वतावरून निघालेली व चंद्र पर्वत किंवा मंगळ पर्वतावर जाणारी रेषा म्हणजे मस्तकरेषा किंवा बुद्धिरेषा होय.


४) **भाग्यरेषा–** भाग्यरेषेलाच धनरेषा असेही म्हणतात. ही रेषा अत्यंत महत्त्वाची आहे. ही रेषा मणिबंधावरून किंवा शुक्र अथवा चंद्र पर्वतावरून सरळ शनि किंवा गुरू पर्वतावर जाते. भाग्यशाली व्यक्तीच्या हातावरच अशी रेषा असते.

५) **आरोग्य रेषा–** आयुष्यरेषेपासून किंवा भाग्यरेषेपासून निघालेली व बुध पर्वताकडे जाणारी ही रेषा आरोग्यरेषा होय.

आपल्या हातावरील आरोग्य रेषा ही पूर्ण असल्यास आरोग्य उत्तम असते. परंतु ती नसेल तरीसुद्धा त्याचा दोष काहीही राहात नाही.

६) **सूर्यरेषा–** सूर्यरेषेलाच यश रेषा असेही म्हणतात. ही मस्तक रेषेवरून किंवा चंद्र पर्वतावरून किंवा हृदय रेषेवरून सूर्य पर्वतावर जाते.

## उजवा हात



शुक्र वलय
शनि वलय
गुरु वलय
हृदय रेषा
लग्न रेषा
मस्तक रेषा
भाग्य रेषा
सूर्य रेषा
आरोग्य रेषा
अंत: दर्शन
मंगळ रेषा
आयुष्य रेषा
प्रवास रेषा
संतान रेषा
विकार रेषा
मणीबंध

# हातावरील रेषांचा अभ्यास अथांग आहे

१) **संतान रेषा–** शुक्र पर्वतावरील उभ्या रेषेला संतान रेषा असे म्हणतात. वैज्ञानिक व शरीरशास्त्राचे सिद्धांतानुसार संतानाबाबतचा संबंध हा शुक्र संबंधित आहे. म्हणून सदरच्या रेषेला संतान रेषा असे म्हणतात.

२) **लग्नरेषा–** हृदय रेषेच्या वरील बाजूस म्हणजेच बुध पर्वतावर सदरची रेषा आडवी असते. या रेषा लहान असतात व त्या महत्त्वाच्या असतात.

३) **विकार रेषा–** शुक्र पर्वतामधून निघालेली व चंद्र पर्वतावर जाणाऱ्या रेषेला विकार रेषा असेही म्हणतात.

४) **प्रवास रेषा–** चंद्र पर्वतावरील उभ्या अगर आडव्या रेषेला प्रवास रेषा असे म्हणतात.

५) **मंगळ रेषा–** आयुष्यरेषेशी समांतर गेलेल्या रेषेला मंगळ रेषा असे म्हणतात.

६) **अंत:दर्शन रेषा–** ही रेषा चंद्र पर्वतावरून बुध पर्वतावर अर्धचंद्राकाराने जाते.

७) **गुरुवलय–** गुरू पर्वतावर अर्ध चंद्राकाराने असलेल्या रेषेला गुरुवलय असे म्हणतात. ही रेषा दोन विरहीत असेल तर अशा व्यक्ती अध्यात्ममार्गी असतात.


८) **शनि वलय–** शनि पर्वतावर अर्धचंद्राकाराने असलेल्या रेषेला शनि वलय असे म्हणतात.

९) **शुक्र वलय–** तर्जनी व मध्यमा यांच्या माध्यमातून अनामिका व करंगळी यांच्या मध्ये चंद्राकाराने जाणाऱ्या रेषेला शुक्रवलय असे म्हणतात.

१०) **मणिबंध रेषा–** शुक्र व चंद्र पर्वताचे खाली म्हणजेच मनगटाकडील बाजूस असणाऱ्या या आडव्या रेषांना मणिबंध रेषा असे म्हणतात.

वरील रेषांची माहिती ही आपण सोबत दिलेल्या हाताच्या चित्रावर पाहून त्यांची माहिती करून घेऊ शकता. यापुढील लेखांमध्ये बोटांची नावे व पर्वत, ग्रह यांची नावे व त्याच ठिकाणी हातावर कोठे आहेत याचा अभ्यास करणार आहोत.

**उजवा हात**




# हस्तरेषा विज्ञान– बोटांची नावे, ग्रह व पर्वत

यापूर्वीच्या लेखामध्ये आपण हातावरील रेषांचा अभ्यास केला आहे. आता आपण हातांच्या बोटांची नावे व हातावरील पर्वत व ग्रह कोठे असतात.